17 DEC 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीचे पालखी पूजनाने कमला कॉलेज येथे प्रारंभ करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. २) कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे आदी. (छाया : अर्जुन टाकळकर)

# ग्रंथदिंडी, महोत्सवाने दीक्षांत सोहळ्यास प्रारंभ

## वाचनसंस्कृतीचा जागर, प्रबोधनपर घोषणा; पालखी मार्गावर विद्यार्थ्यांचा उत्साह

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाचा हिरकमहोत्सवी ६० वा दीक्षांत समारंभ सोमवारी (दि. १८) साजरा होत आहे. या सोहळ्याची सुरुवात शनिवारी सकाळी ग्रंथदिंडीसह ग्रंथमहोत्सवाच्या उद्घाटनाने झाली. सकाळी कमला कॉलेज येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा यांसह राजा शिवछत्रपती, राजर्षी शाहू स्मरणिका, आर्टिफिशियल इंटेलिजन्स ग्रंथ ठेवले होते. टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला.

वाचनसंस्कृतीचा जागर, प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा, सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात




आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पालखी राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात आणून स्थापित झाली. पालखी मार्गावर विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्साह होता.

ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगले, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. शिवराज थोरात, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सुजय पाटील सहभागी झाले होते.

ग्रंथोत्सवातील सर्व स्टॉलची कुलगुरूंसह अधिकाऱ्यांनी फिरून पाहणी केली. याखेरीज हॅंडीहेल्प संस्थेतील दिव्यांगांनी बनविलेल्या वस्तूंच्या विक्रीचा स्टॉल मांडला आहे. या ठिकाणी अन्नपदार्थ विक्रीचे सात स्टॉल आहेत. एम.बी.ए. अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनी व स्टार्टअप उपक्रमास वाहिलेलेही काही स्टॉल आहेत.

### वैविध्यपूर्ण विषयांवरील ग्रंथांची वाचकांना पर्वणी

ग्रंथदिंडीनंतर सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या आमराई परिसरात कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन झाले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. स्थानिकांसह राज्यभरातील २२ प्रकाशक व ग्रंथविक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहणी व खरेदीसाठी उपलब्ध आहेत. त्यामुळे ग्रंथप्रेमी व वाचनवेड्या व्यक्तींसाठी हे प्रदर्शन पर्वणीच आहे.

17 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# टाळ-मृदंगाच्या गजरात वाचन संस्कृतीचा जागर

## शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त सोहळ्यास ग्रंथ दिंडीने प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सवी अर्थात ६० वा दीक्षान्त समारंभ सोमवारी (दि. १८) साजरा होत आहे. याची सुरुवात शनिवारी सकाळी ग्रंथ दिंडीसह ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनाने झाली. कमला महाविद्यालय येथे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ग्रंथ पालखीचे पूजन करण्यात आले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा यासह राजा शिवछत्रपती, राजर्षी शाहू स्मरणिका, आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे ग्रंथ ठेवले होते.

टाळ-मृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. वाचन संस्कृतीचा जागर करत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी राजारामपुरीतून आईचा पुतळा, सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात प्रविष्ट झाली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व अभिवादन करून पालखी राजमाता जिजाईसाहेब बहुउद्देशीय सभागृहात स्थापित करण्यात आली. ग्रंथ दिंडीमध्ये कुलसचिव, डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगले, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. शिवराज थोरात, कमला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सुजय पाटील आदींसह डॉ. आर. पी. आढाव, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. वसंत भागवत, तानाजी कांबळे, अमित गुरव, कैलास पवार, रवींद्र मांगले, ऊर्मिला कदम, स्वाती डिग्रे, नीता पाटील हे विविध महाविद्यालयांतील ग्रंथपालही सहभागी झाले.



कोल्हापूर : ग्रंथांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि डॉ. सुहासिनी पाटील. (छाया : पांडुरंग पाटील)

**ग्रंथांची वाचकांना पर्वणी :** ग्रंथ दिंडीनंतर विद्यापीठाच्या आमराई परिसरात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन, बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. स्थानिकांसह राज्यभरातील २२ प्रकाशक व ग्रंथ विक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत. ग्रंथमहोत्सवात रविवार (दि. १७) सकाळी ११ वाजता संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात 'स्वररंग' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

17 DEC 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीने कोल्हापूर शहरात वाचनसंस्कृतीचा जागर केला.


# ग्रंथदिंडीने वाचनसंस्कृतीचा जागर

## टाळमृदंगाचा गजर; शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या हिरकमहोत्सवी दीक्षान्त समारंभ सोहळ्याचा प्रारंभ आज ग्रंथदिंडी व ग्रंथमहोत्सवाच्या उद्घाटनाने झाला. यंदाच्या ग्रंथदिंडीत सातशेहून अधिक विद्यार्थी, वाचकांनी सहभाग घेत वाचन चळवळ समृद्ध होत असण्याची प्रचिती दिली. कमला महाविद्यालयात सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन झाले. पालखीमध्ये भारताचे संविधान, सार्थ श्री ज्ञानेश्वरी, संत नामदेव गाथा यासह राजा शिवछत्रपती, राजर्षी शाहू स्मरणिका, आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे ग्रंथ ठेवले होते. तेथून टाळमृदंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला.

वाचनसंस्कृतीचा जागर करीत आणि प्रबोधनपर घोषणा देत दिंडी



राजारामपुरीतून आईचा पुतळा आणि सायबर संस्थेमार्गे विद्यापीठाच्या प्रांगणात आली. प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून व अभिवादन करून पालखीअखेरीस राजमाता जिजाईसाहेब बहुउद्देशीय सभागृहात आणण्यात येऊन तेथे स्थापित केली. ग्रंथदिंडीमध्ये कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, निरंतर शिक्षण विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सचिनकुमार पाटील, उप-ग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर, सहायक ग्रंथपाल डॉ. शिवराज थोरात, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. सुजय पाटील सहभागी झाले. ग्रंथदिंडीमध्ये डॉ. आर. पी. आढाव, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. वसंत भागवत, तानाजी कांबळे, अमित गुरव, कैलास पवार, रवींद्र मांगले, ऊर्मिला कदम, स्वाती डिग्रे, नीता पाटील हे ग्रंथपालही सहभागी झाले.

17 DEC 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैविध्यपूर्ण विषयांवरील ग्रंथांची ग्रंथमहोत्सवात वाचकांना पर्वणी

## विद्यापीठात उद्‌घाटन; २२ प्रकाशक, ग्रंथविक्रेते सहभागी




कोल्हापूर : विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवातील स्टॉलवर ग्रंथांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १६ : ग्रंथदिंडीनंतर विद्यापीठाच्या आमराई परिसरात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्‌घाटन झाले. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ प्रकाशन विभागाच्या स्टॉलचे उद्‌घाटन करण्यात आले.

स्थानिकांसह राज्यभरातील २२ प्रकाशक व ग्रंथविक्रेते महोत्सवात सहभागी झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना पाहणी व खरेदीसाठी उपलब्ध आहेत. ग्रंथमहोत्सवात उद्या (ता.१७) सकाळी ११ वाजता संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात 'स्वररंग' या सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. या कार्यक्रमासह तीन दिवस चालू असणाऱ्या या ग्रंथमहोत्सवाचा वाचकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुतार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 DEC 2023

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६०व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवातील स्टॉलवर मांडलेल्या ग्रंथांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. के. गायकवाड आदी.

# विद्यापीठात ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर शनिवारी ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. एस. एस. रंगनाथन व बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांच्या प्रतिमांचे पूजव व दीपप्रज्वलन करण्यात आले.

ग्रंथमहोत्सवामध्ये भारतीय व परदेशी नामवंत प्रकाशनाची पुस्तके, डेटाबेस पॅकिज, डिजीटल ग्रंथ, उपहारगृह आदींचे स्टॉल उभारण्यात आले आहेत. कुलगुरूंसह अधिकाऱ्यांनी पुस्तक व खाद्यपदार्थांच्या स्टॉलची पाहणी केली. हे स्टॉल १८ डिसेंबरपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत खुले राहणार आहेत.

**आज स्वररंग सांसकृतिक कार्यक्रम**

सदर ग्रंथमहोत्सवात उद्या (दि. १७) सकाळी ११ वाजता संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात 'स्वररंग' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सर्वांसाठी खुला आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुतार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 DEC 2023
तरुण भारत

# ग्रंथदिंडीतून वाचन संस्कृतीचा जागर

## विद्यार्थी व प्राध्यापकांनी घातलेल्या गांधी टोप्या ग्रंथ दिंडीचे ठरले मुख्य आकर्षण

- टाळ मृदुंग, ढोल ताशांमुळे दिंडीत चैतन्य
- पथनाटयातून दिला सामाजिक संदेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा करीत सामाजिक संदेश देणारी पथनाट्यांचे सादरीकरण केले. जहाजपथक, लेझीम पथक एकूणच ग्रंथदिंडीने ग्रंथ वाचन आणि मराठी भाषा, संस्कृतीचा जागर केला. शिवाजी विद्यापीठासह विविध महाविद्यालयातील जवळपास सातशेपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांसह अधिकाऱ्यांनी परिधान केलेल्या गांधी टोप्या ग्रंथदिंडीचे मुख्य आकर्षण ठरले.

कमला कॉलेजमध्ये गुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथपालखीचे पूजन करून ग्रंथदिंडीला सुरूवात झाली. राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौकमार्गे लोककला केंद्रात ग्रंथदिंडीची सांगता करण्यात करण्यात आली. फुलांनी सजवलेल्या पालखीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, ज्ञानेश्वरी, संत तुकाराम गाथा अशा अनेक ग्रंथांची आरास मांडण्यात आली होती. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६०व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीने कोल्हापूर शहरात वाचनसंस्कृतीचा जागर केला. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड आदी.

### ग्रंथदिंडीतून मराठी ग्रंथाचे महत्व

ग्रंथदिंडीमध्ये सर्व कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'ग्रंथाची ओळख काळाची गरज', 'ज्ञान म्हणजे आत्मतत्वांचा बोध', 'ग्रंथ हेच गुरू', 'वाचन, चिंतन मनन म्हणजेच अध्ययन', 'पुस्तकांचे रोज करावे पठण, संस्काराचे करावे चिंतन', ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाथी. 'आता नको उशीर, तृणधान्याचा आहारच फायदेशीर', अशा प्रकारच्या पोस्टरच्या माध्यमातून मराठी व वाचन संस्कृतीविषयी जगजागृती करण्यात आली.

17 DEC 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आविष्कार संशोधन स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सामाजिक जाणिवेची प्रचिती



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेतील प्रकल्पांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या सामाजिक जाणिवेची प्रचिती शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या आविष्कार संशोधन स्पर्धेच्या माध्यमातून आली. विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत असणाऱ्या महाविद्यालयांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे.

यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे नागरिक, शेतकरी यांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठीचे प्रकल्प होते. पर्यावरणीय समस्यांवर जैविक विघटनशील प्लास्टिकसारखे पर्याय सादर करणारे प्रकल्पही होते. शिवाय, तृतीयपंथीयांपासून वंचित घटकांच्या सामाजिक समावेशनासाठी, लोकांच्या मानसिक तणावावरील उपाययोजनांपर्यंतच्या प्रकल्पांचाही समावेश होता.

या स्पर्धेत सुमारे ३५० पदवी, पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन संशोधनपर प्रकल्प, पोस्टर सादर केले. विद्यार्थी विकास विभाग व भूगोल अधिविभाग यांनी स्पर्धेचे संयोजन केले.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू, डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. मेघा गुळवणी, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. मीना पोतदार, डॉ. जगदीश सपकाळे, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. सोमनाथ पवार उपस्थित होते. अधिविभागांतील तसेच महाविद्यालयांतील शिक्षकांनी परीक्षक म्हणून तसेच समन्वयक म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष

17 DEC 2023 **पुढारी** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोषणाईने झळकले हीरकमहोत्सवी शिवाजी विद्यापीठ...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षान्त समारंभ सोमवारी (दि. १८) होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई. (छाया : अर्जुन टाकळकर)

17 DEC 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर :** ६० व्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीस करण्यात आलेली आकर्षक विद्युतरोषणाई.

17 DEC 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आय विटनेस

# शिवाजी विद्यापीठ विद्यूत रोषणाईने उजळले.....



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचा हिरकमहोत्सवी दीक्षान्त समारंभ सोमवारी होणार आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीस आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
17 DEC 2023 तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानपीठ तेजसमय...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभानिमित्त मुख्य इमारतीवर केलेली आकर्षक विद्युत रोषणाई. या विद्युत रोषणाईने विद्यापीठ परिसर उजळला होता. (छाया: रियाज ट्रेनर)

17 DEC 2023

जनसंपर्क कक्ष
तरूण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. शिंदे यांना वसुंधरा सन्मान प्रदान

## किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवाची सांगता




**कोल्हापूर : कुलसचिव डॉ. व्हि. एन. शिंदे यांना वसुंधरा सन्मान तर सुहास वायंगणकर, व्हि. टी. पाटील फाउंडेशन जलमित्र फाउंडेशन, मजले व गार्डन्स क्लब यांना वसुंधरा मित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्हि. एन. शिंदे यांना विद्यापीठ परिसर जलयुक्त केल्याबद्दल आणि त्यांच्या विज्ञान शिक्षणाच्या प्रचार–प्रसार कामाची दखल घेत यंदाचा वसुंधरा सन्मान पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या सांगता समारोपात प्रमुख पाहुणे अतुल देऊळगावकर यांच्या हस्ते हा सोहळा झाला, तसेच सुहास वायंगणकर, व्हि. टी. पाटील फाउंडेशन जलमित्र फाउंडेशन, मजले व गार्डन्स क्लब यांना वसुंधरा मित्र पुरस्काराने सन्मानित केले. अध्यक्षस्थानी प्र कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

देऊळगावकर यांनी युरोपातील अनेक देशांमध्ये कलेच्या माध्यमातून पर्यावरणीय संकट मांडले जाते आणि ते अधिक प्रभावीपणे नव्या पिढीला भावते परंतु आपल्याकडे मात्र याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही याची खंत व्यक्त केली.

प्र–कुलगुरू पाटील म्हणाले, वसुंधरा वाचली तरच आपले सर्वांचे अस्तित्व टिकणार आहे.आज आणि आत्ताच प्रत्येकाला जागं होऊन कृतिशील होणे गरजेचे आहे. डॉ. रसिया पडळकर यांनी सूत्रसंचलन केले. शरद आजगेकर यांनी आभार मानले. यावेळी किर्लोस्कर समूहाचे सी. जी. रानडे, धीरज जाधव, विरेंद्र चित्राव, डॉ. आसावरी जाधव आदी उपस्थित होते.

17 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रतिकुल परिस्थितीशी दोन हात करत यश

## सुवर्ण पदक विजेत्या साईसिमरन घाशी व बिल्कीस गवंडीचे मत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभ उद्या (दि. १८) सकाळी ११ वाजता राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यंदाच्या राष्ट्रपती सुवर्णपदकाची मानकरी साईसिमरन घाशी ठरली आहे. तर कुलपती सुवर्ण पदकाची मानकरी बिल्कीस गवंडी ठरली आहे. त्यांच्या या यशाबद्दल तरूण भारत संवादने त्यांच्याशी संवाद साधला. प्रतिकुल परिस्थितीशी दोन हात करीत हे यश मिळवले आहे. यापुढेही आपल्या स्वप्न पूर्तीसाठी कष्ट करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### आईचे स्वप्न पूर्ण करणार: साईसिमरन घाशी



आईने नातेवाईकांचा विरोध पत्करून माझे शिक्षण पूर्ण केले आहे. मला आज शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपतीचे सुवर्णपदक मिळाले हेसुध्दा आईचेच यश म्हणावे लागेल. ज्या आईने माझ्यासाठी कष्ट केले त्या आईचे स्वप्न शासकीय जनसंपर्क अधिकारी होऊन पूर्ण करणार असल्याचे साईसिमरन घाशीने सांगितले. साईसिमरन ही बत्तीस शिराळा (जि.सांगली) येथील आहे. घरची परिस्थती बेताची आहे. आठवीत असताना वडिलांचे निधन झाले. दोन भाऊ व माझा आईने सांभाळ केला. शालेय शिक्षण गावातच झाले. न्यू इंग्लिश स्कूल व ज्यु. पेठ येथे बारावी तर कॉलेजमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण झाले. पदवीचे शिक्षण घेताना व्हाईस ओव्हर आर्टिस्ट म्हणून काम केले. सध्या विद्यापीठात मास कम्युनिकेशन विभागात शिकत आहे. राष्ट्रपती सुवर्णपदकापर्यंतचा प्रवास खडतर राहिला असून पदक मिळाल्याचा आनंद आहे.

### प्राध्यापक होण्याचे स्वप्न: बिल्कीस गवंडी



शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सुवर्णपदक शिरोळ तालुक्यातील आगर येथील बिल्कीस गवंडीला मिळाले. प्राध्यापक होऊन विद्यार्थी घडविण्याचे स्वप्न असल्याचे तिने सांगितले. शिरोळ तालुक्यातील बिल्कीसचे वडील शेतकरी असून आई गृहिणी आहे. शालेय शिक्षण गावात झाल्यावर पदवीपर्यंतचे शिक्षण गंगाबाई घोडावत कन्या महाविद्यालयातून पूर्ण केले. एमएचे शिक्षण जयसिंगपूर कॉलेजमध्ये घेतले. मध्यमवर्गीय कुटुंब असल्याने इलेक्ट्रॉनिक्सच्या शोरुममध्ये 'सीएसआर'म्हणून काम करीत शिक्षण घेतले. कलाशाखेत एमएला प्रथम क्रमांक मिळवला. तिला कुलपतींचे सुवर्णपदक मिळालेच आहे. पण यापुर्वी मारुलकर स्मृती पुरस्कार, डॉ. चंदुलाल दुबे यासह पाच पुरस्कार मिळाले आहेत. नेट-सेट करुन प्राध्यापक होणार असल्याचे बिल्कीसने सांगितले.

17 DEC 2023
लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# साईसिमरन घाशी, बिल्कीस गवंडी यांना सुवर्णपदक

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. (मास.कॉम.) अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन हिदायत घाशी ( बत्तीस शिराळा) हिला सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेजची विद्यार्थिनी बिल्कीस हिदायत गवंडी आगर ) हिला कुलपती सुवर्णपदक



साईसिमरन घाशी



बिल्कीस गवंडी

जाहीर करण्यात आले आहे.

सोमवारी शिवाजी विद्यापीठाच्या ६०व्या दीक्षान्त समारंभात त्यांना ही पदके प्रदान करण्यात येतील, अशी माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2023
पुढारी

# राज्यपाल रमेश बैस उद्या जिल्हा दौऱ्यावर

**कोल्हापूर :** राज्यपाल रमेश बैस सोमवारी (दि.१८) जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. प्रथमच कोल्हापुरात येत असलेल्या बैस यांच्या दौऱ्याची जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात येत आहे. सकाळी दहा वाजता कोल्हापूर विमानतळावर आगमन होईल. दहा वाजून २० मिनिटांनी ते करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे दर्शन घेणार आहेत. पावणे अकरा वाजता रेड क्रॉसच्या कार्यक्रमाला उपस्थित राहतील. कसबा बावडा येथील स्वयम् शाळेलाही ते भेट देणार आहेत. साडेअकरा वाजता शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास ते उपस्थित राहतील. दुपारी दोन वाजता ते कंदलगाव येथे विकसित भारत संकल्प यात्रेंतर्गत लाभार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. दुपारी तीन वाजता ते मुंबईला रवाना होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2023
लोकमत

# राज्यपाल रमेश बैस उद्या कोल्हापुरात

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : राज्यपाल रमेश बैस हे उद्या, सोमवारी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा असा : सोमवारी सकाळी १० वाजता कोल्हापूर विमानतळ येथे आगमन व श्री अंबाबाई मंदिराकडे प्रयाण. सकाळी १०:२० वाजता अंबाबाई दर्शन. सकाळी १०:४५ वाजता रोटरी क्लब कार्यालय (रेडक्रॉस) येथे आगमन व कार्यक्रमास उपस्थिती (स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय जवळ). सकाळी ११ वाजता स्वयम रेडक्रॉस स्कूल, कसबा बावडा येथे आगमन व कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी ११:३० वाजता शिवाजी विद्यापीठ येथे आगमन व विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास उपस्थिती. दुपारी १ वाजता राखीव. १:४५ वाजता कंदलगावकडे प्रयाण. दुपारी २ वाजता विकसित भारत संकल्प यात्रेस भेट. दुपारी ३:१५ वाजता विमानतळ येथे आगमन व राखीव. ३:२० वाजता विमानाने मुंबईकडे प्रयाण

17 DEC 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तरच्या २१९ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या २१९ परीक्षांचे निकाल आजअखेर जाहीर झाले आहे.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सध्या सुरू आहेत. शनिवारी मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन, मास्टर ऑफ सायन्स, एम.एस्सी. (मॅथ्स), मास्टर ऑफ सायन्स (टेक्नॉलॉजी), एम.एस्सी.



टेक्नॉलॉजी यांसह १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ११९८ विद्यार्थी उपस्थित होते. दि. १६ डिसेंबर रोजी बीएसडब्ल्यू, बीडीएससी, बी. व्होक, डिप्लोमा इन मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी, एम.एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बी.ए. डिफेन्स स्टडीज, एम.बी.ए., एम.ए. (मराठी) आदी २४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. दीक्षांत समारंभा दिवशीच्या पूर्वनियोजित असलेल्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. यादिवशी असलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन मंडळावर निपुण कोरे यांची नियुक्ती

**वारणानगर : पुढारी वृत्तसेवा**



येथील श्री वारणा सहकारी बँकेचे व कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष व दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. फेडरेशन मुंबईचे संचालक निपुण विलासराव कोरे यांची महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाच्या संशोधन मंडळावर सहकार क्षेत्रातील बँकिंग तज्ज्ञ म्हणून नियुक्ती झाली आहे.

वारणा परिसराचे भाग्यविधाते सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे यांनी दिलेला सहकाराचा मंत्र व केलेले मागदर्शन आत्मसात करून सहकाराच्या माध्यमातून समाजातील सामान्य शेतकरी, कष्टकरी, नोकरदार व व्यावसाईक यांच्या सर्वांगीण प्रगतीचा ध्यास त्यांना अगदी सुरुवातीपासून आहे.

वारणा सहकारी बँक व कोल्हापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशनच्या माध्यमातून नागरी सहकारी बँकांच्या अनेक अडचणी राज्य सरकार, केंद्र सरकार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्याकडे मांडून त्या सोडवून सभासद, बँकांच्या हिताची अनेक कामे पूर्ण करून योगदान दिले आहे. यापूर्वी निपुणराव कोरे यांचे वडील व वारणा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष स्व. विलासराव विश्वनाथ कोरे यांनी शिवाजी विद्यापीठावर राज्यपालांचे प्रतिनिधी म्हणून काम पाहिले होते. कोरे यांच्या निवडीमुळे विद्यापीठाला बँकिंग अभ्यासक्रमासाठी उपयोग होणार आहे. त्यांची ही निवड म्हणजे बँकिंग क्षेत्रासाठी अभिमानाची गोष्ट असून, त्यांनी आजवर बँकिंग क्षेत्रामध्ये केलेल्या भरीव कार्याची पोच पावतीच म्हणावी लागेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2022
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ प्रशासकीय विभाग आज सुरू राहणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ ६० व्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर



रविवारी (दि. १७) विद्यापीठ कार्यालय नियमित पूर्णवेळ कार्यरत राहणार आहे. त्याचप्रमाणे सोमवारी (दि. १८) दीक्षान्त समारंभादिवशी कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ८.२० पासून ते दुपारी ४ वाजेपर्यंत अशी करण्यात आली आहे. रविवारी सकाळी ११ वाजता ग्रंथ महोत्सवांतर्गत आयोजित 'स्वररंग' हा सांस्कृतिक कार्यक्रम राजमाता जिजाऊसाहेब सभागृहाऐवजी राजर्षी शाहू सिनेट सभागृहात होणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 DEC 2023
लोकमत

# मिसबाह बागवानचा संशोधन प्रकल्प विद्यापीठात प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

आजरा : शिवाजी विद्यापीठाच्यावतीने



घेण्यात आलेल्या २०२३-२४ मधील आविष्कार संशोधन स्पर्धेत आजरा महाविद्यालयाची विद्यार्थिनी मिसबाह बागवान हिने विद्यापीठ स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. 'निओलॉजीजम' विषयावर तिने संशोधन प्रकल्प सादर केला होता. महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने 'लँग्वेज आणि ह्युमॅनिटी' विभागातून हा संशोधन प्रकल्प तयार केला होता.

'आविष्कार'स्पर्धेसाठी प्रथम संस्थात्मक स्तरावर तिने सादरीकरण केले. त्यानंतर विवेकानंद कॉलेज येथे झालेल्या इंटरकॉलेज स्तरावर दुसरा क्रमांक मिळाल्याने विद्यापीठ स्तरावर तिची निवड झाली. विद्यापीठामध्ये झालेल्या या स्पर्धेत तिने उत्कृष्ट संशोधन प्रकल्प सादर करीत पहिला क्रमांक पटकाविला. जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोकअण्णा चराटी, विलास नाईक, संचालक विजयकुमार पाटील यांनी मिसबाह बागवान हिचे अभिनंदन केले.